****

# Vishnu Sahastra Naam Stotra

## (Marathi)

****

**को धर्मः सर्वधर्माणां भवतः परमो मतः।**
**किं जपन्मुच्यते जन्तुर्जन्मसंसारबन्धनात्॥३॥**

सर्व धर्मांमध्ये कोणता धर्म आपल्याला सर्वश्रेष्ठ वाटतो ? तसेच कोणाचा जप केल्याने हा जीव जन्ममरणरूपी संसारबंधनातून मुक्त होतो ? (३)

भीष्म उवाच

**जगत्प्रभुं देवदेवमनन्तं पुरुषोत्तमम्।**
**स्तुवन्नामसहस्रेण पुरुषः सततोत्थितः॥४॥**

**भीष्म म्हणाला** - ह्या सर्व चराचर संसाराचा स्वामी, ब्रह्मादी देवांचाही देव, अंतरहित, क्षर-अक्षर व त्याहून श्रेष्ठ असलेल्या पुरुषोत्तमाचे, सदोदित सजग राहून सहस्रनामांनी गुणकीर्तन केल्याने मनुष्य सर्व दुःखांच्या पलीकडे जातो. (४)

**तमेव चार्चयन्नित्यं भक्त्या पुरुषमव्ययम्।**
**ध्यायन्स्तुवन्नमस्यंश्च यजमानस्तमेव च॥५॥**

त्या अविनाशी परमात्म्याचीच अखंड भक्तीने पूजा, ध्यान, स्तुती आणि वंदन केल्याने मनुष्य सर्व दुःखांपासून मुक्त होतो. (५)

**अनादिनिधनं विष्णुं सर्वलोकमहेश्वरम्।**
**लोकाध्यक्षं स्तुवन्नित्यं सर्वदुःखातिगो भवेत्॥६॥**

आदि-अंत-रहित, सर्व लोकांचा महेश्वर, लोकाध्यक्ष अशा श्रीविष्णूंची सतत स्तुती करण्याने मनुष्य सर्व दुःखांच्या पलीकडे जातो. (६)

**ब्रह्मण्यं सर्वधर्मज्ञं लोकानां कीर्तिवर्धनम्।**
**लोकनाथं महद्भूतं सर्वभूतभवोद्भवम्॥७॥**
**एष मे सर्वधर्माणां धर्मोऽधिकतमो मतः।**
**यद्भक्त्या पुण्डरीकाक्षं स्तवैरर्चेन्नरः सदा॥८॥**

ब्राह्मण, तप, ज्ञान आणि श्रुती यांचा हितकारी अशा, सर्व धर्म जाणणाऱ्या, लोकांची कीर्ती वाढवणाऱ्या, सर्व लोकांचा स्वामी, सर्व भूतांचे परमकारण अशा, भूतमात्रांची उत्पत्ती व पोषण करणाऱ्या, भगवान

वासुदेवांचे भक्तिपूर्वक गुणसंकीर्तन करून नेहमी त्यांची स्तुती व पूजाअर्चा करावी. या धर्माला मी इतर सगळ्या धर्मांपेक्षा सर्वश्रेष्ठ मानतो. (७-८)

**परमं यो महत्तेजः परमं यो महत्तपः।**
**परमं यो महद्ब्रह्म परमं यः परायणम्॥ ९ ॥**
**पवित्राणां पवित्रं यो मङ्गलानां च मङ्गलम्।**
**दैवतं देवतानां च भूतानां योऽव्ययः पिता॥१०॥**
**यतः सर्वाणि भूतानि भवन्त्यादियुगागमे।**
**यस्मिंश्च प्रलयं यान्ति पुनरेव युगक्षये॥११॥**
**तस्य लोकप्रधानस्य जगन्नाथस्य भूपते।**
**विष्णोर्नामसहस्रं मे शृणु पापभयापहम्॥१२॥**

हे राजन ! जो देव परम तेज, परम तप, परम ब्रह्म आणि परम आश्रयस्थान आहे, जो पवित्र करणाऱ्या सर्व तीर्थादिकांना पवित्र करणारा आहे, मंगल करणाऱ्यांचे मंगल करणारा, देवांचाही देव तसेच जो प्राणिमात्राचा अविनाशी पिता आहे, प्रत्येक कल्पाच्या आधी ज्याच्यापासून सर्व चराचर उत्पन्न होते व युगान्तसमयी ज्याच्यामध्ये विलीन होते, त्या लोकप्रधान, सर्व संसाराचा स्वामी अशा भगवान विष्णूंची पाप व भवभय नाहीसे करणारी हजार नावे मी सांगतो, ती ऐक. (९-१२)

**यानि नामानि गौणानि विख्यातानि महात्मनः।**
**ऋषिभिः परिगीतानि तानि वक्ष्यामि भूतये॥१३॥**

जी नावे त्याच्या गुणांमुळे पडलेली गुणविशेषणे आहेत, त्यांतील जी नावे सुप्रसिद्ध आहेत आणि ऋषींनी ज्यांचे गुणकीर्तन केले आहे, अशी त्या परमात्मा विष्णूची नावे तुझ्या कल्याणासाठी मी सांगतो. (१३)

**ॐविश्वं विष्णुर्वषट्कारो भूतभव्यभवत्प्रभुः।**
**भूतकृद् भूतभृद् भावो भूतात्मा भूतभावनः॥१४॥**

१. **विश्वम्** - सर्व विश्वाचे कारणरूप २. **विष्णुः** - सर्वव्यापी ३. **वषट्कारः** - ज्याच्या उद्देशाने यज्ञात वषट्क्रिया केली जाते, असा,

यज्ञस्वरूप ४. **भूतभव्यभवत्प्रभुः** - भूत, भविष्य व वर्तमान ह्यांचा स्वामी ५. **भूतकृत्** -भूतमात्रास उत्पन्न करणारा ६. **भूतभृत्** - भूतमात्रांचे पालनपोषण करणारा ७. **भाव:**- प्रपंचरूपाने उत्पन्न होणारा ८. **भूतात्मा**- भूतमात्राचा आत्मा, सर्वांतर्यामी ९. **भूतभावन:** - प्राणिमात्राची उत्पत्ती व वृद्धी करणारा (१४)

**पूतात्मा परमात्मा च मुक्तानां परमा गतिः।**
**अव्ययः पुरुषः साक्षी क्षेत्रज्ञोऽक्षर एव च ॥१५॥**

१०. **पूतात्मा** - पवित्र आत्मा ११. **परमात्मा** - श्रेष्ठ नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, आत्मा १२. **मुक्तानां परमा गतिः** - मुक्त पुरुषांची सर्वश्रेष्ठ गती १३. **अव्ययः** - विनाश किंवा विकार नसलेला १४. **पुरुषः** - शरीरात राहाणारा १५. **साक्षी** - स्वतःच्या ज्ञानाने सर्व पाहणारा १६. **क्षेत्रज्ञ:** - शरीराला जाणणारा १७. **अक्षरः** - कधीही क्षीण न होणारा (१५)

**योगो योगविदां नेता प्रधानपुरुषेश्वरः।**
**नारसिंहवपुः श्रीमान् केशवः पुरुषोत्तमः ॥१६॥**

१८. **योगः** - मनासह सर्व इंद्रियांच्या निरोधरूप योगाने प्राप्त होणारा १९. **योगविदां नेता**- योग जाणणाऱ्यांचा नायक २०. **प्रधानपुरुषेश्वरः** - प्रकृती व जीव यांचा स्वामी २१. **नारसिंहवपुः** - नरसिंहरूप धारण करणारा २२. **श्रीमान्** - वक्षःस्थळावर सदा लक्ष्मी धारण करणारा २३. **केशवः** - केशी दैत्याला मारणारा २४. **पुरुषोत्तमः** - क्षर व अक्षर ह्या दोन्हींपेक्षाही श्रेष्ठ (१६)

**सर्वः शर्वः शिवः स्थाणुर्भूतादिर्निधिरव्ययः।**
**सम्भवो भावनो भर्ता प्रभवः प्रभुरीश्वरः ॥१७॥**

२५. **सर्वः** - सत आणि असत या सर्वांचे उत्पत्ती, स्थिती व लय ह्यांचे स्थान, सर्वकाळी सर्व जाणणारा २६. **शर्वः** - प्रलयकाली रुद्ररूपाने सर्वसंहारक २७. **शिवः**-तीनही गुणांनी रहित व कल्याणस्वरूप २८. **स्थाणुः**- स्थिर २९. **भूतादिः**- प्राणिमात्रांचे आदिकारण

३०. **निधिरव्यय:**- प्रलयाच्या वेळी सर्व प्राणिमात्र ज्यात विलीन होतात, असे अविनाशी स्थान **३१. संभव:** -आपल्या इच्छेने प्रकट होणारा **३२. भावन:** - सर्व भोक्त्यांची (कर्माची) फळे उत्पन्न करणारा **३३. भर्ता** - सर्वांचे पोषण करणारा **३४. प्रभव:** - दिव्य जन्म धारण करणारा **३५. प्रभु:**- सर्व क्रिया करण्यात अधिक सामर्थ्यवान **३६. ईश्वर:** - उपाधिरहित ऐश्वर्ययुक्त असलेला (१७)

**स्वयम्भू: शम्भुरादित्य: पुष्कराक्षो महास्वन:।**
**अनादिनिधनो धाता विधाता धातुरुत्तम:।।१८।।**

३७. **स्वयंभू:** - स्वत:च उत्पन्न झालेला **३८. शंभु:** - भक्तांसाठी सुखाची उत्पत्ती करणारा **३९. आदित्य:** - बारा आदित्यांपैकी विष्णुनामक आदित्य **४०. पुष्कराक्ष:** -कमलनेत्र **४१. महास्वन:**- वेदरूप अत्यंत गंभीर आवाज असणारा **४२. अनादिनिधन:**- जन्ममरणरहित **४३. धाता** - विश्वाचे धारण करणारा **४४. विधाता**- कर्म व फलाचा रचनाकार **४५. धातुरुत्तम:** - सर्व प्रपंच धारण करणारा सर्वश्रेष्ठ(१८)

**अप्रमेयो हृषीकेश: पद्मनाभोऽमरप्रभु:।**
**विश्वकर्मा मनुस्त्वष्टा स्थविष्ठ: स्थविरो ध्रुव: ।।१९।।**

४६. **अप्रमेय:**- कोणत्याही प्रमाणाने जाणता न येणारा **४७. हृषीकेश:** - इंद्रियांचा स्वामी **४८. पद्मनाभ:**- जगाच्या कारणरूप कमळास आपल्या नाभीत स्थान देणारा **४९. अमरप्रभु:** -देवाधिदेव **५०. विश्वकर्मा** - साऱ्या जगाची रचना करणारा **५१. मनु:** - मनुरूपी प्रजापती **५२. त्वष्टा** - संहारकाळी सर्व प्राण्यांना क्षीण करणारा **५३. स्थविष्ठ:**- अत्यंत स्थूल **५४. स्थविरो ध्रुव:** - अत्यंत प्राचीन व स्थिर (१९)

**अग्राह्य: शाश्वत: कृष्णो लोहिताक्ष: प्रतर्दन:।**
**प्रभूतस्त्रिककुब्धाम पवित्रं मङ्गलं परम्।।२०।।**

५५. **अग्राह्य:** - कर्मेन्द्रियांनी घेता न येणारा **५६. शाश्वत:** - सर्वकाळी अस्तित्वात असलेला **५७. कृष्ण:** - सच्चिदानंदस्वरूप

५८. **लोहिताक्षः** - लाल डोळे असलेला ५९. **प्रतर्दनः**- प्रलयकाली सर्वसंहारक ६०. **प्रभूतः**- ज्ञान, ऐश्वर्य इत्यादी गुणांनी संपन्न ६१. **त्रिककुब्धाम** - वर, खाली, मध्ये या तीनही दिशांचे आश्रयस्थान ६२. **पवित्रम्** - सर्वांना पावन करणारा ६३. **मंगलं परम्** - अशुभ नष्ट करून शुभाची प्राप्ती करून देणारा (२०)

**ईशानः प्राणदः प्राणो ज्येष्ठः श्रेष्ठः प्रजापतिः ।**
**हिरण्यगर्भो भूगर्भो माधवो मधुसूदनः ॥२१॥**

६४. **ईशानः** - सर्वनियामक ६५. **प्राणदः** - प्राणदान करणारा ६६. **प्राणः** - प्राणरूप ६७. **ज्येष्ठः** - सर्वांचे आदिकारण ६८. **श्रेष्ठः**- सर्वोत्कृष्ट ६९. **प्रजापतिः** - सर्वांचा स्वामी ७०. **हिरण्यगर्भः**- ब्रह्मदेवाचा आत्मा ७१. **भूगर्भः**- पृथ्वीला धारण करणारा ७२. **माधवः** - लक्ष्मीपती ७३. **मधुसूदनः** - मधू नावाच्या राक्षसाला मारणारा (२१)

**ईश्वरो विक्रमी धन्वी मेधावी विक्रमः क्रमः ।**
**अनुत्तमो दुराधर्षः कृतज्ञः कृतिरात्मवान् ॥२२॥**

७४. **ईश्वरः** - सर्वशक्तिमान ७५. **विक्रमी** - शूर ७६.**धन्वी** - शार्ङ्गधनुष्यधारी ७७. **मेधावी**- अनेक ग्रंथांचे ज्ञान धारण करण्याचे सामर्थ्य असलेला ७८. **विक्रमः**- गरुडावरून फिरणारा ७९. **क्रमः** - चालण्याला कारण ८०. **अनुत्तमः**- सर्वोत्तम ८१. **दुराधर्षः** - अजिंक्य ८२. **कृतज्ञः** - प्राण्यांची कर्मे जाणणारा ८३. **कृतिः** - कृतीचा आधार ८४. **आत्मवान्** - आपल्याच महिम्यात राहणारा (२२)

**सुरेशः शरणं शर्म विश्वरेताः प्रजाभवः ।**
**अहः संवत्सरो व्यालः प्रत्ययः सर्वदर्शनः ॥२३॥**

८५. **सुरेशः** - देवांचा स्वामी ८६. **शरणम्** - दुःखी लोकांचा आश्रय ८७. **शर्म**- परमानंदस्वरूप ८८. **विश्वरेताः**- विश्वाचे कारण ८९. **प्रजाभवः**- प्रजेची उत्पत्ती करणारा ९०. **अहः** - प्रकाशरूप ९१. **संवत्सरः**- कालरूप ९२. **व्यालः** - सर्पासारखा पकडण्यास कठीण

९३. **प्रत्ययः** - अनुभवरूप ९४. **सर्वदर्शनः** - सर्व पाहणारा (२३)

**अजः सर्वेश्वरः सिद्धः सिद्धिः सर्वादिरच्युतः।**
**वृषाकपिरमेयात्मा सर्वयोगविनिःसृतः ॥२४॥**

९५. **अजः** - अजन्मा ९६. **सर्वेश्वरः** - देवाधिदेव ९७. **सिद्धः** - नित्यसिद्ध ९८. **सिद्धिः** - सर्वांचे फलरूप ९९. **सर्वादिः** - सर्व भूतांचे आदिकारण १००. **अच्युतः** - आपल्या स्वरूप-सामर्थ्यापासून कधीही न ढळणारा १०१. **वृषाकपिः** - धर्म व वराहरूप १०२. **अमेयात्मा** - प्रमाणरहित १०३. **सर्वयोगविनिःसृतः** - सर्व योगसाधनांनी जाणता येणारा (२४)

**वसुर्वसुमनाः सत्यः समात्मासम्मितः समः।**
**अमोघः पुण्डरीकाक्षो वृषकर्मा वृषाकृतिः ॥२५॥**

१०४. **वसुः** - चराचराचे वसतिस्थान १०५. **वसुमनाः** - विकाररहित मनाचा १०६. **सत्यः** - सत्यस्वरूप १०७. **समात्मा** - सर्वांत एकटाच आत्मरूपाने राहणारा १०८. **असम्मितः** - अमाप १०९. **समः** - लक्ष्मीसह असणारा ११०. **अमोघः** - सेवादी निष्फळ न करणारा १११. **पुण्डरीकाक्षः**-हृदयस्थ कमळात राहणारा ११२. **वृषकर्मा**- धर्मरूप कर्म असणारा ११३. **वृषाकृतिः**-धर्मस्थापनेसाठी अवतार घेणारा (२५)

**रुद्रो बहुशिरा बभ्रुर्विश्वयोनिः शुचिश्रवाः।**
**अमृतः शाश्वतस्थाणुर्वरारोहो महातपाः ॥२६॥**

११४. **रुद्रः** - दुःखहर्ता ११५. **बहुशिराः**- अनेक मस्तके असलेला ११६. **बभ्रुः**-पालन करणारा ११७. **विश्वयोनिः**- विश्व उत्पन्न करणारा ११८. **शुचिश्रवाः**- पवित्र नामे असलेला ११९. **अमृतः**- अमर १२०. **शाश्वतस्थाणुः**- नित्य व स्थिर १२१. **वरारोहः** - श्रेष्ठ मांडी असलेला १२२. **महातपाः**- सृष्टीविषयीचे श्रेष्ठ ज्ञान असणारा (२६)

**सर्वगः सर्वविद्भानुर्विष्वक्सेनो जनार्दनः।**
**वेदो वेदविदव्यङ्गो वेदाङ्गो वेदवित्कविः ॥२७॥**

१२३. **सर्वगः** - कारणरूपाने सर्वव्यापी १२४. **सर्वविद्धानुः** - सर्वज्ञ, प्रकाशरूप १२५. **विष्वक्सेनः**- युद्धाच्या नुसत्या तयारीने दैत्यसैन्याला चारही दिशांना पळविणारा १२६. **जनार्दनः**- भक्त ज्याची याचना करतात, असा १२७. **वेदः** - वेदस्वरूप १२८. **वेदवित्** - वेद जाणणारा १२९. **अव्यंगः** - ज्ञानादिकांनी परिपूर्ण १३०. **वेदाङ्गः** - वेद ज्याचे अंग आहे, असा १३१. **वेदवित्** - वेदांचा विचार करणारा १३२. **कविः**- सर्वज्ञ (२७)

**लोकाध्यक्षः सुराध्यक्षो धर्माध्यक्षः कृताकृतः ।**
**चतुरात्मा चतुर्व्यूहश्चतुर्दंष्ट्रश्चतुर्भुजः ॥२८॥**

१३३. **लोकाध्यक्षः** - सर्व लोकांचा साक्षी १३४. **सुराध्यक्षः** - देवतांचा अध्यक्ष १३५. **धर्माध्यक्षः** -अनुरूप फल देण्यास धर्म व अधर्म प्रत्यक्ष पाहाणारा १३६. **कृताकृतः** - कार्यरूपाने उत्पन्न आणि कारणरूपाने उत्पन्न न झालेला १३७. **चतुरात्मा** - सृष्टीच्या उत्पत्तीसाठी, ब्रह्मा, दक्षादी प्रजापती, काल आणि संपूर्ण जीव-ह्या चार विभूतिस्वरूप असणारा १३८. **चतुर्व्यूहः** - वासुदेव, प्रद्युम्न, अनिरुद्ध, संकर्षण अशा चार मूर्ती असलेला १३९. **चतुर्दंष्ट्रः** - चार दाढा असलेला, नरसिंहरूप १४०. **चतुर्भुजः** - चार हात असलेला (२८)

**भ्राजिष्णुर्भोजनं भोक्ता सहिष्णुर्जगदादिजः।**
**अनघो विजयो जेता विश्वयोनिः पुनर्वसुः ॥२९॥**

१४१. **भ्राजिष्णुः** - प्रकाशरूप १४२. **भोजनम्** - मायारूपाने आस्वाद घेण्यास योग्य १४३. **भोक्ता** - पुरुषरूपाने भोगणारा १४४. **सहिष्णुः** - दैत्यांचे बळ सहन करणारा. (त्यांचा पराभव करणारा.) १४५. **जगदादिजः**- जगाच्या आधी हिरण्यगर्भरूपाने स्वतः उत्पन्न होणारा १४६. **अनघः** - निष्पाप १४७. **विजयः**- ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य, इत्यादी गुणांनी विश्वाला जिंकणारा १४८. **जेता**- स्वभावतः भूतमात्रांहून वरचढ १४९. **विश्वयोनिः**- विश्व व त्याचे कारण १५०. **पुनर्वसुः** - पुन्हा पुन्हा शरीरात आत्मरूपाने राहणारा (२९)

**उपेन्द्रो वामन: प्रांशुरमोघ: शुचिरूर्जित: ।**
**अतीन्द्र: संग्रह: सर्गो धृतात्मा नियमो यम: ।।३०।।**

**१५१. उपेन्द्र:** - इंद्राचा धाकटा भाऊ **१५२. वामन:** - वामनरूपाने अवतार घेणारा **१५३. प्रांशु:** - तिन्ही लोकांहून उंच **१५४. अमोघ:** - ज्याची क्रिया निष्फळ नाही असा **१५५. शुचि:** - पवित्र करणारा **१५६. ऊर्जित:**-अत्यंत बलशाली **१५७. अतीन्द्र:**-इंद्रापेक्षाही श्रेष्ठ **१५८. संग्रह:** - प्रलयकाळी सर्वांना सामावून घेणारा **१५९. सर्ग:** - सृष्टिरूप **१६०. धृतात्मा** - नेहमी एकरूप असणारा **१६१. नियम:**- लोकांना आपापल्या अधिकारात ठेवणारा **१६२. यम:**- अंत:करणात राहून नियमन करणारा (३०)

**वेद्यो वैद्य: सदायोगी वीरहा माधवो मधु:।**
**अतीन्द्रियो महामायो महोत्साहो महाबल: ।।३१।।**

**१६३. वेद्य:** - कल्याणाची इच्छा असणाऱ्याकडून जाणण्यास योग्य **१६४. वैद्य:** - सर्व विद्या जाणणारा **१६५. सदायोगी** - नेहमी प्रत्यक्ष असणारा **१६६. वीरहा** - राक्षसांना मारणारा **१६७. माधव:** - विद्यापती **१६८. मधु:** - मधाप्रमाणे प्रसन्नता उत्पन्न करणारा **१६९. अतीन्द्रिय:**- इंद्रियातीत **१७०. महामाय:** - मायावींच्या वर आपल्या मायेचे वर्चस्व ठेवणारा **१७१. महोत्साह:** - परम उत्साही **१७२. महाबल:** - अत्यंत बलशाली (३१)

**महाबुद्धिर्महावीर्यो महाशक्तिर्महाद्युति:।**
**अनिर्देश्यवपु: श्रीमानमेयात्मा महाद्रिधृक् ।।३२।।**

**१७३. महाबुद्धि:** - महान बुद्धिमान **१७४. महावीर्य:** - माया हे ज्याचे महान वीर्य आहे, असा. **१७५. महाशक्ति:** - महान सामर्थ्यवान **१७६. महाद्युति:** - अंतर्बाह्य अत्यंत कान्तिमान **१७७. अनिर्देश्यवपु:** - ज्याच्या शरीराविषयी सांगणे शक्य नाही, असा **१७८. श्रीमान्** - समग्र ऐश्वर्यशाली **१७९. अमेयात्मा** - ज्याच्या बुद्धीचे मोजमाप केले

जात नाही, असा **१८०. महाद्रिधृक्** - मंदर आणि गोवर्धन या महान पर्वतांना धारण करणारा (३२)

**महेष्वासो महीभर्ता श्रीनिवास: सतां गति:।**
**अनिरुद्ध: सुरानन्दो गोविन्दो गोविदां पति: ।।३३।।**

**१८१. महेष्वास:** - महाधनुष्य धारण करणारा **१८२. महीभर्ता** - पृथ्वी धारण करणारा **१८३. श्रीनिवास:** - ज्याच्या वक्षावर श्री निवास करीत आहे, असा **१८४. सतां गति:** - सत्पुरुषांचे आश्रयस्थान **१८५. अनिरुद्ध:** - प्रगट होताना कोणाकडूनही अडविला न जाणारा **१८६. सुरानन्द:** - देवतांना आनंद देणारा **१८७. गोविन्द:** - पाताळात नाहीशा झालेल्या पृथ्वीला मिळविणारा **१८८. गोविदां पति:** - वाणी जाणणाऱ्यांचा स्वामी (३३)

**मरीचिर्दमनो हंस: सुपर्णो भुजगोत्तम:।**
**हिरण्यनाभ: सुतपा: पद्मनाभ: प्रजापति: ।।३४।।**

**१८९. मरीचि:** - तेजस्व्यांचे परम तेज **१९०. दमन:** - प्रमाद करणाऱ्यांना शासन करणारा **१९१. हंस:** - सर्व शरीरांत जाणारा. **१९२. सुपर्ण:** - गरुडस्वरूप सुंदर पंख असलेला **१९३. भुजगोत्तम:** - नागांमध्ये श्रेष्ठ शेष **१९४. हिरण्यनाभ:**- सुवर्णाप्रमाणे नाभी असलेला **१९५. सुतपा:** - नर-नारायणरूपाने सुंदर तप करणारा **१९६. पद्मनाभ:**- कमळासारखी सुंदर नाभी असलेला **१९७. प्रजापति:** - सर्व प्रजेचे पालन करणारा (३४)

**अमृत्यु: सर्वदृक् सिंह: संधाता संधिमान् स्थिर: ।**
**अजो दुर्मर्षण: शास्ता विश्रुतात्मा सुरारिहा ।।३५।।**

**१९८. अमृत्यु:**- अमर **१९९. सर्वदृक्** - प्राण्यांची सर्व कर्मे पाहणारा **२००. सिंह:** - संहार करणारा **२०१. संधाता** - कर्मांचे फळ देणारा **२०२. संधिमान्** - फळ उपभोगणारा **२०३. स्थिर:** - सदा एकरूप **२०४. अज:** - भक्तांच्या हृदयांत जाणारा **२०५. दुर्मर्षण:** -

दानवादिकांना सहन न होणारा **२०६. शास्ता** - श्रुतिस्मृतींनी सर्वांचे अनुशासन करणारा **२०७. विश्रुतात्मा** - आत्म्याला विशेषरूपाने जाणणारा **२०८. सुरारिहा** - देवांच्या शत्रूंना मारणारा (३५)

**गुरुर्गुरुतमो धाम सत्यः सत्यपराक्रमः।**
**निमिषोऽनिमिषः स्रग्वी वाचस्पतिरुदारधीः ॥३६॥**

**२०९. गुरुः** - सर्व विद्यांचा उपदेशक **२१०. गुरुतमः** - ब्रह्मदेव इत्यादींनाही ब्रह्मविद्या प्रदान करणारा **२११. धाम** - परम ज्योतिरूप **२१२. सत्यः** - सत्यस्वरूप **२१३. सत्यपराक्रमः** - अमोघ पराक्रमी **२१४. निमिषः** - योगनिद्रेने ज्याचे नेत्र निमीलित आहेत, असा **२१५. अनिमिषः** - नित्य प्रबुद्धस्वरूप **२१६. स्रग्वी** - वैजयंतीमाला धारण करणारा **२१७. वाचस्पतिरुदारधीः** - विद्यापती व सर्व पदार्थांना साक्षात पाहाणारा (३६)

**अग्रणीर्ग्रामणीः श्रीमान् न्यायो नेता समीरणः।**
**सहस्रमूर्धा विश्वात्मा सहस्राक्षः सहस्रपात् ॥३७॥**

**२१८. अग्रणीः** - मुमुक्षूंना उत्तम पदावर नेणारा **२१९. ग्रामणीः** - भूतसमुदायाचा नेता **२२०. श्रीमान्** - अतिशय कान्तिसंपन्न **२२१. न्यायः** - सर्वप्रमाणांचा आश्रयभूत जो तर्क तत्स्वरूप **२२२. नेता** - जगत्स्वरूप यंत्र चालवणारा **२२३. समीरणः** - श्वासरूपाने भूतमात्राच्या शरीरक्रिया करविणारा **२२४. सहस्रमूर्धा** - हजारो मस्तके असलेला **२२५. विश्वात्मा** - विश्वाचा आत्मा **२२६. सहस्राक्षः** - हजारो डोळे असलेला **२२७. सहस्रपात्** - हजारो पाय असलेला (३७)

**आवर्तनो निवृत्तात्मा संवृतः सम्प्रमर्दनः।**
**अहः संवर्तको वह्निरनिलो धरणीधरः ॥३८॥**

**२२८. आवर्तनः** - संसारचक्र चालवण्याचा स्वभाव असलेला **२२९. निवृत्तात्मा** - संसारबंधनांतून मुक्त **२३०. संवृतः** - आपल्याच योगमायेने झाकलेला **२३१. सम्प्रमर्दनः** - आपल्या रौद्र स्वरूपाने सर्वांचे मर्दन

करणारा **२३२. अहः संवर्तकः** - सूर्यरूपाने नियमितपणे दिवसाचे चक्र चालवणारा **२३३. वह्निः** - यज्ञार्पित वस्तू वाहणारा अग्निदेव **२३४. अनिलः** - अनादी **२३५. धरणीधरः** - पृथ्वी धारण करणारा (३८)

**सुप्रसादः प्रसन्नात्मा विश्वधृग्विश्वभुग्विभुः।**
**सत्कर्ता सत्कृतः साधुर्जह्नुर्नारायणो नरः ॥३९॥**

**२३६. सुप्रसादः** - उत्तम कृपा करणारा **२३७. प्रसन्नात्मा** - करुणार्द्र स्वभाव असलेला **२३८. विश्वधृक्** - जगदाधार **२३९. विश्वभुक्** - विश्वाचे रक्षण करणारा **२४०. विभुः** - विविध रूपांनी प्रगट होणारा **२४१. सत्कर्ता** - सत्कार करणारा **२४२. सत्कृतः** - पूजितांच्याकडून पुजला जाणारा **२४३. साधुः** - योग्य न्याय करणारा **२४४. जह्नुः** - संहाराच्या वेळी जीवांचा लय करणारा **२४५. नारायणः** - जलात शयन करणारा **२४६. नरः** - भक्तांना परमधामात घेऊन जाणारा (३९)

**असंख्येयोऽप्रमेयात्मा विशिष्टः शिष्टकृच्छुचिः।**
**सिद्धार्थः सिद्धसंकल्पः सिद्धिदः सिद्धिसाधनः ॥४०॥**

**२४७. असंख्येयः** - ज्याच्यात नाम, रूप इत्यादी भेद नाहीत, असा **२४८. अप्रमेयात्मा** - ज्याच्या स्वरूपाचे मोजमाप होत नाही, असा **२४९. विशिष्टः** - सर्वोत्कृष्ट **२५०. शिष्टकृत्** - शासन करणारा **२५१. शुचिः** - परम पवित्र **२५२. सिद्धार्थः** - ज्याचे सर्व अर्थ सिद्ध झाले आहेत, असा **२५३. सिद्धसंकल्पः** - सत्यसंकल्प असलेला **२५४. सिद्धिदः** - कर्माचे योग्य फल देणारा **२५५. सिद्धिसाधनः** - सिद्धींचा दाता (४०)

**वृषाही वृषभो विष्णुर्वृषपर्वा वृषोदरः।**
**वर्धनो वर्धमानश्च विविक्तः श्रुतिसागरः ॥४१॥**

**२५६. वृषाही** - ज्याच्यामध्ये यज्ञ किंवा धर्म आहेत, असा **२५७. वृषभः** - भक्तांसाठी इच्छित वस्तूंचा वर्षाव करणारा **२५८. विष्णुः** - सर्वव्याप्त **२५९. वृषपर्वा** - परमपदाची इच्छा करणाऱ्यांसाठी धर्मरूप

शिडी २६०. **वृषोदर:** - उदरातून प्रजेचा वर्षाव करणारा २६१. **वर्धन:**- वाढविणारा २६२. **वर्धमान:** - प्रपंचरूपाने वाढणारा २६३. **विविक्त:**- संसारापासून अलिप्त, विरागी २६४. **श्रुतिसागर:** - वेदांची खाण (४१)

**सुभुजो दुर्धरो वाग्मी महेन्द्रो वसुदो वसु:।**
**नैकरूपो बृहद्रूप: शिपिविष्ट: प्रकाशन: ।।४२।।**

२६५. **सुभुज:** - जगाचे रक्षण करणारे अति सुंदर हात असलेला २६६. **दुर्धर:** - धारण करण्यास कठीण २६७. **वाग्मी** - देववाणी उत्पन्न करणारा २६८. **महेंद्र:** - ईश्वरांचाही ईश्वर २६९. **वसुद:** - धन देणारा २७०. **वसु:** - अंतरिक्षात राहाणारा २७१. **नैकरूप:** - अनेक रूपे धारण करणारा २७२. **बृहद्रूप:** - महान रूपे धारण करणारा २७३. **शिपिविष्ट:**- किरणांत राहाणारा २७४. **प्रकाशन:** - सर्वांना प्रकाशित करणारा (४२)

**ओजस्तेजोद्युतिधर: प्रकाशात्मा प्रतापन:।**
**ऋद्ध: स्पष्टाक्षरो मन्त्रश्चन्द्रांशुर्भास्करद्युति: ।।४३।।**

२७५. **ओजस्तेजोद्युतिधर:** - प्राणबल, शौर्यादी गुण, तसेच प्रभा धारण करणारा २७६. **प्रकाशात्मा** - प्रकाशस्वरूप २७७. **प्रतापन:** - सूर्य इत्यादी आपल्या विभूतींनी विश्वाला तापवणारा २७८. **ऋद्ध:** - धर्म, ज्ञान, वैराग्य इत्यादींनी संपन्न २७९. **स्पष्टाक्षर:** - ॐकाररूप उदात्त अक्षर असलेला २८०. **मन्त्र:** - वेदमंत्रस्वरूप २८१. **चंद्राशु:** - संसारतापाने पोळलेल्या लोकांना चंद्रकिरणांप्रमाणे आह्लाददायक २८२. **भास्करद्युति:**- सूर्याप्रमाणे तेज असलेला (४३)

**अमृतांशूद्भवो भानु: शशबिन्दु: सुरेश्वर:।**
**औषधं जगत: सेतु: सत्यधर्मपराक्रम: ।।४४।।**

२८३. **अमृतांशूद्भव:**- चंद्र ज्याच्यापासून उत्पन्न झाला, तो २८४. **भानु:**- प्रकाशमान २८५. **शशबिन्दु:** - चंद्राप्रमाणे प्राणिमात्राचे पोषण करणारा २८६. **सुरेश्वर:** - देवाधिदेव २८७. **औषधम्** - संसाररोगावरचे औषध २८८. **जगत: सेतु:**- भवसागर पार करण्याकरता सेतुरूप

२८९. **सत्यधर्मपराक्रम:** - धर्म आदी गुण व पराक्रम ज्याचा सत्य आहे, तो (४४)

**भूतभव्यभवन्नाथ: पवन: पावनोऽनल:।**
**कामहा कामकृत्कान्त: काम: कामप्रद: प्रभु: ॥४५॥**

२९०. **भूतभव्यभवन्नाथ:** - त्रैकालिक सर्व प्राण्यांचा स्वामी २९१. **पवन:** - वायुरूप २९२. **पावन:** - चालक २९३. **अनल:** - अनंत २९४. **कामहा**- भक्तांच्या विषयवासना नष्ट करणारा २९५. **कामकृत्**- भक्तांच्या कामना पूर्ण करणारा २९६. **कान्त:** - अत्यंत रूपवान २९७. **काम:** - पुरुषार्थाची आकांक्षा करणाऱ्यांकडून इच्छिलेला २९८. **कामप्रद:** - भक्तांच्या कामना सर्वस्वी पूर्ण करणारा २९९. **प्रभु:** - सर्वोत्कृष्ट (४५)

**युगादिकृद्युगावर्तो नैकमायो महाशन:।**
**अदृश्यो व्यक्तरूपश्च सहस्रजिदनन्तजित् ॥४६॥**

३००. **युगादिकृत्** - युगादिकांचा आरंभ करणारा ३०१. **युगावर्त:**- चारही युगे चक्राप्रमाणे फिरवणारा ३०२. **नैकमाय:** - अनेक माया धारण करणारा ३०३. **महाशन:** - कल्पाच्या शेवटी सर्वांना ग्रासून टाकणारा ३०४. **अदृश्य:** - इंद्रियांना कळू न शकणारा ३०५. **व्यक्तरूप:**- स्वयंप्रकाश असल्याने योग्यांना स्पष्ट दिसणारा ३०६. **सहस्रजित्** - युद्धात देवांच्या हजारो शत्रूंना जिंकणारा ३०७. **अनन्तजित्** - युद्धात किंवा खेळात सर्वांना जिंकणारा (४६)

**इष्टोऽविशिष्ट: शिष्टेष्ट: शिखण्डी नहुषो वृष:।**
**क्रोधहा क्रोधकृत्कर्ता विश्वबाहुर्महीधर:॥४७॥**

३०८. **इष्ट:** - परमानंदरूपामुळे सर्वांना प्रिय असलेला ३०९. **अविशिष्ट:**- सर्वांच्या अन्तर्यामी असल्यामुळे विशिष्ट नसलेला. ३१०. **शिष्टेष्ट:**- श्रेष्ठ पुरुषांना प्रिय ३११. **शिखण्डी**- मोरपिसांचा मुकुट धारण करणारा ३१२. **नहुष:**- प्राणिमात्राला मायेने बांधून टाकणारा ३१३. **वृष:**-

कामना पूर्ण करणारा **३१४. क्रोधहा** - क्रोधाचा नाश करणारा **३१५. क्रोधकृत्कर्ता** - क्रोधी दुष्टांना मारणारा **३१६. विश्वबाहु:**- ज्याचे हात सर्वत्र आहेत, असा **३१७. महीधर:** - पूजा घेणारा (४७)

**अच्युत: प्रथित: प्राण: प्राणदो वासवानुज:।**
**अपां निधिरधिष्ठानमप्रमत्त: प्रतिष्ठित: ॥४८॥**

**३१८. अच्युत:** - षड्विकाररहित **३१९. प्रथित:** - जगाची उत्पत्ती वगैरे कामे करण्यामुळे प्रसिद्ध **३२०. प्राण:** - भूतमात्राचा प्राणस्वरूप **३२१. प्राणद:** - देवांना बल देणारा व असुरांचे बळ नाहीसे करणारा **३२२. वासवानुज:**- इंद्राचा धाकटा बंधू **३२३. अपां निधि:**- समुद्ररूप **३२४. अधिष्ठानम्**- उपादान कारणरूपाने प्राणिमात्राचे आश्रयस्थान **३२५. अप्रमत्त:** - अधिकारानुसार कर्मफल देण्यामध्ये कधीही चूक न करणारा **३२६. प्रतिष्ठित:** -आपल्या महिम्यामध्ये स्थित असलेला (४८)

**स्कन्द: स्कन्दधरो धुर्यो वरदो वायुवाहन:।**
**वासुदेवो बृहद्भानुरादिदेव: पुरंदर: ॥४९॥**

**३२७. स्कन्द:** - अमृतरूपाने वाहणारा अथवा वायुरूपाने सुकविणारा **३२८. स्कन्दधर:** - धर्ममार्गाला धारण करणारा **३२९. धुर्य:** - प्राणिमात्राचे जन्मादिरूप ओझे वाहाणारा **३३०. वरद:** - इच्छित वर देणारा **३३१. वायुवाहन:** - आवह आदी सात वायूंना गती देणारा **३३२. वासुदेव:** - प्राणिमात्राला स्वत:मध्ये ठेवणारा व देवांचे उत्पत्तिस्थान असलेला **३३३. बृहद्भानु:** - प्रचंड किरणांनी संपूर्ण जगाला प्रकाशित करणारा **३३४. आदिदेव:** - सर्वांचे कारण असलेला देव **३३५. पुरंदर:** - असुरांच्या नगरांचा नाश करणारा (४९)

**अशोकस्तारणस्तार: शूर: शौरिर्जनेश्वर:।**
**अनुकूल: शतावर्त: पद्मी पद्मनिभेक्षण: ॥५०॥**

**३३६. अशोक:** - शोकरहित **३३७. तारण:** - भवसागर तरून

नेणारा **३३८. तारः** - जन्म आदी भीतीपासून तारणारा **३३९. शूरः** - पराक्रमी **३४०. शौरिः** - वसुदेवाचा पुत्र **३४१. जनेश्वरः** - प्राण्यांचा ईश्वर **३४२. अनुकूलः** - आत्मरूप असल्याने सर्वांना अनुकूल **३४३. शतावर्तः** - शेकडो अवतार घेणारा **३४४. पद्मी** - हातात कमळ धारण करणारा **३४५. पद्मनिभेक्षणः** - कमळाप्रमाणे नेत्र असलेला (५०)

**पद्मनाभोऽरविन्दाक्षः पद्मगर्भः शरीरभृत्।**
**महर्द्धिर्ऋद्धो वृद्धात्मा महाक्षो गरुडध्वजः॥५१॥**

**३४६. पद्मनाभः** - हृदयकमलात राहाणारा **३४७. अरविन्दाक्षः** - कमळासारखे डोळे असलेला **३४८. पद्मगर्भः**- हृदयकमळामध्ये ध्यान करण्यास योग्य **३४९. शरीरभृत्** - अन्नरूपाने शरीराचे पोषण करून त्यांना धारण करणारा **३५०. महर्द्धिः**- महाविभूती असलेला **३५१. ऋद्धः** - प्रपंचरूप **३५२. वृद्धात्मा** - अतिपुरातन **३५३. महाक्षः** - मोठे डोळे असलेला **३५४. गरुडध्वजः** - ज्याच्या ध्वजावर गरुडाचे चिह्न आहे, असा (५१)

**अतुलः शरभो भीमः समयज्ञो हविर्हरिः।**
**सर्वलक्षणलक्षण्यो लक्ष्मीवान् समितिञ्जयः॥५२॥**

**३५५. अतुलः** - अतुलनीय **३५६. शरभः** - शरीरामध्ये आत्मरूपाने विराजमान **३५७. भीमः** - भीती उत्पन्न करणारा **३५८. समयज्ञः** - उत्पत्ती, स्थिती, लय यांचा समय जाणणारा **३५९. हविर्हरिः** - यज्ञामध्ये हविर्द्रव्य ग्रहण करणारा **३६०. सर्वलक्षणलक्षण्यः** - सर्व लक्षणांनी लक्षित होणारा **३६१. लक्ष्मीवान्** - लक्ष्मीने नित्य युक्त **३६२. समितिञ्जयः** - युद्धात विजयी होणारा (५२)

**विक्षरो रोहितो मार्गो हेतुर्दामोदरः सहः।**
**महीधरो महाभागो वेगवानमिताशनः॥५३॥**

**३६३. विक्षरः** - नाशरहित **३६४. रोहितः** - लाल किंवा रोहित नामक माशाचे रूप धारण करणारा **३६५. मार्गः** - परमानंदाच्या प्राप्तीचे

साधन **३६६. हेतु:** - संसाराचे निमित्त आणि उपादान कारण **३६७. दामोदर:** - ज्याच्या पोटाला दावे बांधले आहे असा **३६८. सह:** - सर्व काही सहन करणारा **३६९. महीधर:**- पर्वतरूपाने पृथ्वीला धारण करणारा **३७०. महाभाग:** - अवतारांत महान भाग्य असलेला **३७१. वेगवान्** - तीव्र वेग असलेला **३७२. अमिताशन:**- साऱ्या विश्वाचे भक्षण करणारा (५३)

**उद्भव: क्षोभणो देव: श्रीगर्भ: परमेश्वर:।**
**करणं कारणं कर्ता विकर्ता गहनो गुह: ।।५४।।**

**३७३. उद्भव:** - जगाच्या उत्पत्तीचे उपादानकारण **३७४. क्षोभण:**- जगाच्या उत्पत्तीच्या वेळी प्रकृती व पुरुषामध्ये प्रविष्ट होऊन त्यांना क्षुब्ध करणारा **३७५. देव:** - अंतरात्मरूपाने प्रकाशित **३७६. श्रीगर्भ:**- जगद्रूपी श्री आपल्या उदरामध्ये ठेवणारा **३७७. परमेश्वर:** - सर्वश्रेष्ठ नियंता **३७८. करणम्** - संसाराच्या उत्पत्तीचे मुख्य साधन **३७९. कारणम्**- जगाचे उपादान आणि निमित्त कारण **३८०. कर्ता**- सर्वप्रकारे स्वतंत्र **३८१. विकर्ता** - निरनिराळ्या भुवनांची विशिष्ट रचना करणारा **३८२. गहन:** - समजून न येणारा **३८३. गुह:** - योगमायेने आपल्या स्वरूपास झाकणारा (५४)

**व्यवसायो व्यवस्थान: संस्थान: स्थानदो ध्रुव:।**
**परर्द्धि: परमस्पष्टस्तुष्ट: पुष्ट: शुभेक्षण: ।।५५।।**

**३८४. व्यवसाय:** - ज्ञानमात्रस्वरूप **३८५. व्यवस्थान:** - सर्व विश्वाची व्यवस्था करणारा **३८६. संस्थान:** - प्रलयकाळी प्राणिमात्राचे स्थान असलेला **३८७. स्थानद:**- प्रत्येकाला कर्माप्रमाणे स्थान देणारा **३८८. ध्रुव:** - अविनाशी **३८९. परर्द्धि:** -श्रेष्ठ विभूतिस्वरूपी **३९०. परमस्पष्ट:**- श्रेष्ठ वैभव व ज्ञान असलेला **३९१. तुष्ट:**- एकमात्र परमानन्दस्वरूप **३९२. पुष्ट:** - सर्वत्र परिपूर्ण **३९३. शुभेक्षण:** - दर्शनाने कल्याण करणारा (५५)

**रामो विरामो विरतो मार्गो नेयो नयोऽनयः।**
**वीरः शक्तिमतां श्रेष्ठो धर्मो धर्मविदुत्तमः ॥५६॥**

**३९४. रामः** - ज्याच्या स्वरूपात योगी रमतात, तो **३९५. विरामः**- जन ज्याच्यात विराम पावतात असा **३९६. विरतः** - विषयसेवनाची आवड नसलेला **३९७. मार्गः** -ज्याला जाणण्याने मुमुक्षू अमर होतात, तो **३९८. नेयः**- अत्युच्च ज्ञानाने परमात्मरूपाला नेला जाणारा **३९९. नयः**- नेणारा **४००. अनयः** - ज्याला कोणी नेता नाही असा **४०१. वीरः**- पराक्रमी **४०२. शक्तिमतां श्रेष्ठः**- शक्तिमानांमध्येही श्रेष्ठ **४०३. धर्मः**- धारण करणारा **४०४. धर्मविदुत्तमः**- सर्व धर्मवेत्त्यांमध्ये उत्कृष्ट (५६)

**वैकुण्ठः पुरुषः प्राणः प्राणदः प्रणवः पृथुः।**
**हिरण्यगर्भः शत्रुघ्नो व्याप्तो वायुरधोक्षजः ॥५७॥**

**४०५. वैकुण्ठः** - पंचभूतांच्या परस्परविरोधी गती अडवून त्यांना एकमेकांशी जोडणारा **४०६. पुरुषः** - शरीरात राहणारा **४०७. प्राणः** - प्राणवायुस्वरूप **४०८. प्राणदः**- प्राण्यांचे प्राण खंडित करणारा **४०९. प्रणवः** - ज्याला वेदही प्रणाम करतात, असा ॐकाररूपी **४१०. पृथुः** - प्रपंचरूपाने विस्तार पावणारा **४११. हिरण्यगर्भः** - ज्याच्यापासून हिरण्यमय अण्डे उत्पन्न झाले, तो **४१२. शत्रुघ्नः**- शत्रूंना मारणारा **४१३. व्याप्तः** - कारणरूपाने सर्व कार्यांत व्याप्त असणारा **४१४. वायुः** - वायुरूप **४१५. अधोक्षजः** - आपल्या स्वरूपापासून क्षीण न होणारा (५७)

**ऋतुः सुदर्शनः कालः परमेष्ठी परिग्रहः।**
**उग्रः संवत्सरो दक्षो विश्रामो विश्वदक्षिणः ॥५८॥**

**४१६. ऋतुः** - काळरूप **४१७. सुदर्शनः**- ज्याचे दर्शन मोक्ष देणारे आहे, असा **४१८. कालः**- सर्वांची गणना करणारा **४१९. परमेष्ठी** - आपल्या सर्वोत्तम महिम्यात राहणारा **४२०. परिग्रहः**- शरणार्थी ज्याला सर्वत्र पाहतात, असा **४२१. उग्रः** - सूर्य आदी ज्याचे भय बाळगतात

असा ४२२. **संवत्सर:** - सर्व भूतमात्रांचे निवासस्थान ४२३. **दक्ष:**- सर्व कार्ये तत्परतेने करणारा ४२४. **विश्राम:** - मुमुक्षूंना विश्रांती देणारा ४२५. **विश्वदक्षिण:** - सर्वांत दक्ष (५८)

**विस्तार: स्थावरस्थाणु: प्रमाणं बीजमव्ययम्।**
**अर्थोऽनर्थो महाकोशो महाभोगो महाधन: ॥५९॥**

४२६. **विस्तार:** - सकल भुवनांचा विस्तार ज्यामध्ये आहे असा ४२७. **स्थावरस्थाणु:** - स्वत: स्थिर असून पृथ्वी आदींना स्थैर्य देणारा ४२८. **प्रमाणम्** - ज्ञानरूप असल्याने स्वयंप्रमाणरूपी ४२९. **बीजमव्ययम्** - संसाराचे एकमेव अविनाशी कारण ४३०. **अर्थ:**- सुखस्वरूप असल्याने सर्वजण ज्याची प्रार्थना करतात तो ४३१. **अनर्थ:** - कृतकृत्य असल्याने प्रयोजनरहित ४३२. **महाकोश:** - अन्नमय इत्यादी महाकोशांनी झाकलेला ४३३. **महाभोग:** - आनंदरूप श्रेष्ठ भोजन घेणारा ४३४. **महाधन:** - ज्याचे भोगाचे साधन-स्वरूप महान धन आहे, असा (५९)

**अनिर्विण्ण: स्थविष्ठोऽभूर्धर्मयूपो महामख:।**
**नक्षत्रनेमिर्नक्षत्री क्षम: क्षाम: समीहन: ॥६०॥**

४३५. **अनिर्विण्ण:** - उदासीनता नसलेला ४३६. **स्थविष्ठ:** - विराटरूपात असलेला ४३७. **अभू:** - अजन्मा ४३८. **धर्मयूप:** - धर्माचा आधारस्तंभ ४३९. **महामख:** - ज्याला अर्पित यज्ञ मोक्षफल देणारे असल्याने महान ठरतात म्हणून ४४०. **नक्षत्रनेमि:** - सर्व नक्षत्रांचे केंद्रस्वरूप ४४१. **नक्षत्री** - चंद्ररूप ४४२. **क्षम:** - सर्व कार्यांस समर्थ ४४३. **क्षाम:** - कार्यनाश झाल्यावर मूळ स्वरूपात असलेला ४४४. **समीहन:** - उत्पत्ती आदीसाठी उत्तम प्रयत्नशील असलेला (६०)

**यज्ञ इज्यो महेज्यश्च क्रतु: सत्रं सतां गति:।**
**सर्वदर्शी विमुक्तात्मा सर्वज्ञो ज्ञानमुत्तमम् ॥६१॥**

४४५. **यज्ञ:** - सर्वयज्ञस्वरूप ४४६. **इज्य:** - पूजनीय ४४७.

**महेज्यः** - सर्वांपेक्षा श्रेष्ठ मोक्षफळ देणारा म्हणून अधिक पूज्य ४४८. **क्रतुः** - यूपयुक्त यज्ञस्वरूप ४४९. **सत्रम्** - जगापासून भक्तांचे रक्षण करणारा ४५०. **सतां गतिः** - सत्पुरुषांचे अनन्यसाध्य ४५१. **सर्वदर्शी** - प्राण्यांच्या सर्व कर्मांचा साक्षी ४५२. **विमुक्तात्मा** - स्वभावतः मुक्त ४५३. **सर्वज्ञः** - स्वतः सर्व असून जाणणारा ४५४. **ज्ञानमुत्तमम्** - ब्रह्मज्ञानस्वरूप (६१)

**सुव्रतः सुमुखः सूक्ष्मः सुघोषः सुखदः सुहृत्।**
**मनोहरो जितक्रोधो वीरबाहुर्विदारणः ॥६२॥**

४५५. **सुव्रतः** - शुभ व्रत असलेला ४५६. **सुमुखः** - प्रसन्न मुख असलेला ४५७. **सूक्ष्मः** - अत्यंत सूक्ष्म ४५८. **सुघोषः** - वेदरूप सुंदर वाणी असलेला ४५९. **सुखदः** - भक्तांना सुख देणारा ४६०. **सुहृत्** - निःस्वार्थी प्रेम करणारा ४६१. **मनोहरः**- मन हरण करणारा ४६२. **जितक्रोधः** - क्रोधावर विजय मिळवणारा ४६३. **वीरबाहुः** - पराक्रमी बाहू असलेला ४६४. **विदारणः** - अधर्म्यांचा नाश करणारा (६२)

**स्वापनः स्ववशो व्यापी नैकात्मा नैककर्मकृत्।**
**वत्सरो वत्सलो वत्सी रत्नगर्भो धनेश्वरः ॥६३॥**

४६५. **स्वापनः** - प्राणिमात्रास अज्ञाननिद्रेत झोपविणारा ४६६. **स्ववशः** - स्वतंत्र ४६७. **व्यापी** - सर्वव्याप्त ४६८. **नैकात्मा**- अनेक रूपे घेणारा ४६९. **नैककर्मकृत्** - अनेक कर्मे करणारा ४७०. **वत्सरः**- सर्वांचे निवासस्थान ४७१. **वत्सलः** - भक्तांवर प्रेम करणारा ४७२. **वत्सी** - प्रजारूप वासरांना पाळणारा ४७३. **रत्नगर्भः** - रत्नयुक्त समुद्ररूप ४७४. **धनेश्वरः** - धनाचा स्वामी (६३)

**धर्मगुब्धर्मकृद्धर्मी सदसत्क्षरमक्षरम्।**
**अविज्ञाता सहस्रांशुर्विधाता कृतलक्षणः ॥६४॥**

४७५. **धर्मगुप्** - धर्मरक्षक ४७६. **धर्मकृत्** - धर्मस्थापक ४७७. **धर्मी** - सर्व धर्मांचा आधार ४७८. **सत्** - सत्यस्वरूप ४७९. **असत्** -

स्थूल जगत्स्वरूप ४८०. **क्षरम्** - सर्वभूतमय ४८१. **अक्षरम्** - अविनाशी ४८२. **अविज्ञाता** - जीवापेक्षा निराळा ४८३. **सहस्रांशु:** - सूर्यरूप ४८४. **विधाता**- भूतधारक शेष, दिग्गज व पर्वत यांना विशेषरूपाने धारण करणारा ४८५. **कृतलक्षण:** - श्रीवत्स आदी चिह्ने धारण करणारा (६४)

**गभस्तिनेमि: सत्त्वस्थ: सिंहो भूतमहेश्वर:।**
**आदिदेवो महादेवो देवेशो देवभृद्गुरु: ॥६५॥**

४८६. **गभस्तिनेमि:** - किरणरूप चक्रामध्ये सूर्यरूपाने स्थित ४८७. **सत्त्वस्थ:** - मुख्यत: सत्त्वगुणात राहाणारा ४८८. **सिंह:** - नरसिंहरूप ४८९. **भूतमहेश्वर:** - सर्व प्राण्यांचा महेश्वर ४९०. **आदिदेव:** - सर्वांचे मूळकारण व दिव्यस्वरूप ४९१. **महादेव:** - आत्मज्ञान, योग, ऐश्वर्य इत्यादी महिमा असलेला ४९२. **देवेश:** - देवांचाही देव ४९३. **देवभृद्गुरु:** - देवांचे पोषण करणारा असून गुरू (६५)

**उत्तरो गोपतिर्गोप्ता ज्ञानगम्य: पुरातन:।**
**शरीरभूतभृद्भोक्ता कपीन्द्रो भूरिदक्षिण: ॥६६॥**

४९४. **उत्तर:** - सर्वश्रेष्ठ ४९५. **गोपति:** - गोपाल ४९६. **गोप्ता**- रक्षण करणारा ४९७. **ज्ञानगम्य:** - केवळ ज्ञानाने जाणता येणारा ४९८. **पुरातन:** - केवळ सर्वादी ४९९. **शरीरभूतभृत्**- शरीराची रचना करणाऱ्या पंचमहाभूतांचे प्राणरूपाने पालन करणारा ५००. **भोक्ता**- स्वानंद उपभोगणारा ५०१. **कपींद्र:** - वानरांचे स्वामी श्रीराम ५०२. **भूरिदक्षिण:** - यज्ञाच्यावेळी भरपूर दक्षिणा देणारा (६६)

**सोमपोऽमृतप: सोम: पुरुजित्पुरुसत्तम:।**
**विनयो जय: सत्यसंधो दाशार्ह: सात्वतां पति: ॥६७॥**

५०३. **सोमप:** - यज्ञामध्ये सोमरस पिणारा ५०४. **अमृतप:** - देवतांना अमृत पाजून स्वत: अमृतपान करणारा ५०५. **सोम:** - चंद्ररूपाने औषधी वाढविणारा ५०६. **पुरुजित्** - सर्वांवर विजय मिळवणारा ५०७. **पुरुसत्तम:** - विश्वरूप व सर्वोत्कृष्ट ५०८. **विनय:** - दुष्टांना दंड

देणारा ५०९. **जय:** - सर्वांना जिंकणारा ५१०. **सत्यसंध:** - सत्यप्रतिज्ञ ५११. **दाशार्ह:** - दशार्ह कुळाचा वंशज ५१२. **सात्वतां पति:** - सात्वत तंत्र रचणाऱ्यांचा स्वामी (६७)

**जीवो विनयितासाक्षी मुकुन्दोऽमितविक्रमः।**
**अम्भोनिधिरनन्तात्मा महोदधिशयोऽन्तकः॥६८॥**

५१३. **जीव:** - क्षेत्रज्ञरूपाने प्राण धारण करणारा ५१४. **विनयिता-साक्षी** - विनयशीलता प्रत्यक्ष पाहाणारा ५१५. **मुकुन्द:** - मुक्तिदाता ५१६. **अमितविक्रम:** - अपरिमित तीन पावले असलेला ५१७. **अम्भोनिधि:** - देवतादींचे निवासस्थान ५१८. **अनन्तात्मा** - ज्याच्या स्वरूपाचा अन्त नाही असा ५१९. **महोदधिशय:** - महासागरात निद्रा घेणारा ५२०. **अन्तक:** - प्राणिमात्रांचा अंत करणारा (६८)

**अजो महार्हः स्वाभाव्यो जितामित्रः प्रमोदनः।**
**आनन्दो नन्दनो नन्दः सत्यधर्मा त्रिविक्रमः॥६९॥**

५२१. **अज:** - कामस्वरूप ५२२. **महार्ह:** - पूजनीय ५२३. **स्वाभाव्य:** - नित्यसिद्ध ५२४. **जितामित्र:** - अन्तर्बाह्य शत्रूंना जिंकणारा ५२५. **प्रमोदन:** - नित्य प्रसन्न आणि ध्यानाने भक्तांना प्रसन्नता देणारा ५२६. **आनन्द:** - आनंदस्वरूप ५२७. **नन्दन:** - सर्वांना आनंद देणारा ५२८. **नन्द:** - सर्व सिद्धींनी संपन्न ५२९. **सत्यधर्मा** - ज्याचे ज्ञान आदी धर्म सत्य आहेत तो ५३०. **त्रिविक्रम:** - तीन पावलांत तिन्ही लोकांना व्यापणारा (६९)

**महर्षिः कपिलाचार्यः कृतज्ञो मेदिनीपतिः।**
**त्रिपदस्त्रिदशाध्यक्षो महाशृङ्गः कृतान्तकृत्॥७०॥**

५३१. **महर्षि: कपिलाचार्य:** - सांख्यशास्त्राचे प्रणेते महर्षी कपिलाचार्य ५३२. **कृतज्ञ:** - विश्वरूप व आत्मरूप ५३३. **मेदिनीपति:** - पृथ्वीचा स्वामी ५३४. **त्रिपद:** - तीन पाय असलेला ५३५. **त्रिदशाध्यक्ष:** - जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तीन अवस्थांचा साक्षी ५३६. **महाशृङ्ग:** -

मत्स्यावतारात मोठे शिंग धारण करणारा **५३७. कृतान्तकृत्** - मृत्यूचाही अंत करणारा (७०)

**महावराहो गोविन्दः सुषेणः कनकाङ्गदी।**
**गुह्यो गभीरो गहनो गुप्तश्चक्रगदाधरः ॥७१॥**

**५३८. महावराहः** - महावराहरूप धारण करणारा **५३९. गोविन्दः** - वेदाने जाणता येणारा **५४०. सुषेणः** - ज्याची सुंदर सेना आहे तो **५४१. कनकाङ्गदी** - ज्याच्या बाहूंत सोन्याचे बाजूबंद आहेत, असा **५४२. गुह्यः** - हृदयाकाशात गुप्तपणे राहाणारा **५४३. गभीरः** - अत्यंत गंभीर स्वभाव असलेला **५४४. गहनः** - ज्याच्यात प्रवेश करणे अवघड आहे, असा **५४५. गुप्तः** - वाणी आणि मनाने न जाणता येणारा **५४६. चक्रगदाधरः** - भक्तांचे रक्षण करण्यासाठी मनस्तत्त्वरूप चक्र आणि बुद्धितत्त्वरूप गदा धारण करणारा (७१)

**वेधाः स्वाङ्गोऽजितः कृष्णो दृढः संकर्षणोऽच्युतः।**
**वरुणो वारुणो वृक्षः पुष्कराक्षो महामनाः ॥७२॥**

**५४७. वेधाः** - निर्माण करणारा **५४८. स्वाङ्गः**- कार्य करण्यात स्वतःच सहकारी असलेला **५४९. अजितः** - न जिंकला जाणारा **५५०. कृष्णः**- व्यासरूप **५५१. दृढः**- खंबीर **५५२. सङ्कर्षणोऽच्युतः** - संहाराच्यावेळी सर्वांना स्वतःमध्ये आकर्षून घेणारा व न ढळणारा **५५३. वरुणः**- सायंकाळचा सूर्य **५५४. वारुणः**- वसिष्ठरूप **५५५. वृक्षः** - अचल **५५६. पुष्कराक्षः** - हृदयकमळात चिंतन केल्यानंतर प्रगट होणारा **५५७. महामनाः**- उत्पत्ती, स्थिती आणि लय केवळ संकल्पाने करणारा (७२)

**भगवान् भगहानन्दी वनमाली हलायुधः।**
**आदित्यो ज्योतिरादित्यः सहिष्णुर्गतिसत्तमः ॥७३॥**

**५५८. भगवान्**- षडैश्वर्यसंपन्न **५५९. भगहा**- जगातले सर्व ऐश्वर्य संहाराच्यावेळी काढून घेणारा **५६०. आनंदी**- परमसुखस्वरूप **५६१.**

**वनमाली**- भूततन्मात्रांची वैजयंतीमाला धारण करणारा ५६२. **हलायुध:**- नांगर ज्याचे आयुध आहे, असा बलरामस्वरूप ५६३. **आदित्य:** - अदितीपुत्र वामन ५६४. **ज्योतिरादित्य:** - सूर्यमंडळातील ज्योतीमध्ये असलेला ५६५. **सहिष्णु:** - कोणतेही द्वंद्व सहन करणारा ५६६. **गति-सत्तम:** - सत्पुरुषांची अंतिम गती आणि सर्वश्रेष्ठ असलेला (७३)

**सुधन्वा खण्डपरशुर्दारुणो द्रविणप्रद:।**
**दिव:स्पृक् सर्वदृग्व्यासो वाचस्पतिरयोनिज:॥७४॥**

५६७. **सुधन्वा** - इंद्रियादिरूप सुंदर शार्ङ्ग धनुष्य धारण करणारा ५६८. **खण्डपरशु:**- शत्रूंचे खंडन करणारा परशू धारण करणारा परशुराम ५६९. **दारुण:**- सन्मार्गविरोधकांना भयंकर ५७०. **द्रविणप्रद:**- भक्तांना इच्छित धन देणारा ५७१. **दिव:स्पृक्** - स्वर्गलोकापर्यंत व्याप्त ५७२. **सर्वदृग्व्यास:**- सर्व ज्ञानांचा विस्तार करणारा व्यासस्वरूप ५७३. **वाचस्पतिरयोनिज:**- विद्यांचा पती असून स्त्रीपासून न जन्मणारा (७४)

**त्रिसामा सामग: साम निर्वाणं भेषजं भिषक्।**
**संन्यासकृच्छम: शान्तो निष्ठा शान्ति: परायणम्॥७५॥**

५७४. **त्रिसामा** - देवव्रत नावाच्या तीन सामश्रुतींनी ज्याची स्तुती केली जाते, असा ५७५. **सामग:** - सामवेदाचे गायन करणारा ५७६. **साम** - सामवेदस्वरूप ५७७. **निर्वाणम्**- परमानंदस्वरूप ५७८. **भेषजम्**- भवरोगावरची औषधी ५७९. **भिषक्** - भवरोग हरण करण्याकरता गीतामृतपान करविणारा वैद्य ५८०. **संन्यासकृत्** - मोक्षासाठी संन्यासाश्रमाची व्यवस्था करणारा ५८१. **शम:**- संन्याशांना ज्ञानाचा उपदेश देणारा ५८२. **शान्त:** - विषयसुखात अनासक्त ५८३. **निष्ठा** - प्रलयकाळी ज्यात सर्व प्राणी समाविष्ट होतात, तो ५८४. **शान्ति:** - ब्रह्मस्वरूप ५८५. **परायणम्** - परम स्थान (७५)

**शुभाङ्ग: शान्तिद: स्रष्टा कुमुद: कुवलेशय:।**
**गोहितो गोपतिर्गोप्ता वृषभाक्षो वृषप्रिय:॥७६॥**

**५८६. शुभाङ्गः** - मनोहर शरीर धारण करणारा **५८७. शान्तिदः** - परमशांती देणारा **५८८. स्रष्टा** - सृष्टीची रचना करणारा **५८९. कुमुदः**- पृथ्वीवर आनंदित होणारा **५९०. कुवलेशयः** - समुद्रात शयन करणारा **५९१. गोहितः** - गाईंचे रक्षण करणारा **५९२. गोपतिः** - पृथ्वीचा स्वामी **५९३. गोप्ता**- जगाचे रक्षण करणारा **५९४. वृषभाक्षः**- धर्मदृष्टी असलेला **५९५. वृषप्रियः** - धर्मप्रिय (७६)

**अनिवर्ती निवृत्तात्मा संक्षेप्ता क्षेमकृच्छिवः।**
**श्रीवत्सवक्षाः श्रीवासः श्रीपतिः श्रीमतांवरः ॥७७॥**

**५९६. अनिवर्ती**- रणभूमीतून मागे न हटणारा **५९७. निवृत्तात्मा**- विषयांपासून स्वभावतः दूर राहाणारा **५९८. संक्षेप्ता**- प्रलयकाळी सृष्टीला सूक्ष्म करणारा **५९९. क्षेमकृत्**- प्राप्त पदार्थाचे रक्षण करणारा **६००. शिवः**-नामस्मरणानेही पवित्र करणारा **६०१. श्रीवत्सवक्षाः**- वक्षावरती श्रीवत्स चिह्न धारण करणारा **६०२. श्रीवासः**-ज्याच्या हृदयात लक्ष्मीचे निवासस्थान आहे, असा **६०३. श्रीपतिः**-लक्ष्मीचा पती **६०४. श्रीमतांवरः**-वेदरूप ऐश्वर्याने युक्त अशा ब्रह्मादी देवांच्यापेक्षा श्रेष्ठ (७७)

**श्रीदः श्रीशः श्रीनिवासः श्रीनिधिः श्रीविभावनः।**
**श्रीधरः श्रीकरः श्रेयः श्रीमाँल्लोकत्रयाश्रयः ॥७८॥**

**६०५. श्रीदः** - भक्तांना ऐश्वर्य देणारा **६०६. श्रीशः** - लक्ष्मीपती **६०७. श्रीनिवासः** - श्रीमंतांमध्ये नित्य वास करणारा **६०८. श्रीनिधिः**- सर्व ऐश्वर्याचा आधार **६०९. श्रीविभावनः** - मनुष्यांना कर्मानुसार ऐश्वर्य देणारा **६१०. श्रीधरः** - मायेला धारण करणारा **६११. श्रीकरः**- स्मरण, स्तवन आणि पूजन करणाऱ्यांना ऐश्वर्य देणारा **६१२. श्रेयः**- परमकल्याणरूपी **६१३. श्रीमान्** - सर्व प्रकारच्या ऐश्वर्याने युक्त **६१४. लोकत्रयाश्रयः** - तीनही लोकांचे आश्रयस्थान (७८)

**स्वक्षः स्वङ्गः शतानन्दो नन्दिर्ज्योतिर्गणेश्वरः।**
**विजितात्माविधेयात्मा सत्कीर्तिश्छिन्नसंशयः॥७९॥**

**६१५. स्वक्ष:**- कमळासारखे सुंदर डोळे असलेला **६१६. स्वङ्ग:**- मनोहर शरीर असलेला **६१७. शतानन्द:**-शेकडो प्रकारे आनंद देणारा **६१८. नन्दि:**- परमानन्दस्वरूप **६१९. ज्योतिर्गणेश्वर:**- नक्षत्र-समुदायांचा ईश्वर **६२०. विजितात्मा**- ज्याने मन जिंकले आहे, असा **६२१. अविधेयात्मा**-ज्याचे सत्य स्वरूप अवर्णनीय आहे, असा **६२२. सत्कीर्ति:**-सत्य कीर्ती असलेला **६२३. छिन्नसंशय:**-संशयरहित(७९)

**उदीर्ण: सर्वतश्चक्षुरनीश: शाश्वतस्थिर:।**
**भूशयो भूषणो भूतिर्विशोक: शोकनाशन: ॥८०॥**

**६२४. उदीर्ण:**- सर्व प्राण्यांत श्रेष्ठ **६२५. सर्वतश्चक्षु:**- सर्वत्र पाहणारा **६२६. अनीश:**- ज्याला कोणी शास्ता नाही, असा **६२७. शाश्वतस्थिर:**- नित्य असून अविकारी **६२८. भूशय:** - लंकागमनाच्यावेळी समुद्रतटावर झोपणारा **६२९. भूषण:** - अवतार धारण करून भूमीची शोभा वाढविणारा **६३०. भूति:** - सर्व विभूतींचे कारण **६३१. विशोक:** - शोकरहित **६३२. शोकनाशन:**- भक्तांच्या शोकाचा नाश करणारा (८०)

**अर्चिष्मानर्चित: कुम्भो विशुद्धात्मा विशोधन:।**
**अनिरुद्धोऽप्रतिरथ: प्रद्युम्नोऽमितविक्रम:॥८१॥**

**६३३. अर्चिष्मान्** - चंद्रसूर्यादी सगळ्यांना देदीप्यमान करणाऱ्या किरणांनी युक्त **६३४. अर्चित:** - ब्रह्मदेवादिकांकडून पूजनीय **६३५. कुम्भ:** - घड्याप्रमाणे ज्यात सर्व गोष्टी समाविष्ट आहेत, असा **६३६. विशुद्धात्मा** - त्रिगुणातीत **६३७. विशोधन:** - स्मरण करताच पापांचा नाश करणारा **६३८. अनिरुद्ध:** - शत्रूंकडून अडविला न जाणारा **६३९. अप्रतिरथ:** - ज्याला कोणी विरोधी नाही, असा **६४०. प्रद्युम्न:** - श्रेष्ठ धन असलेला **६४१. अमितविक्रम:** - असीम पराक्रमी (८१)

**कालनेमिनिहा वीर: शौरि: शूरजनेश्वर: ।**
**त्रिलोकात्मा त्रिलोकेश: केशव: केशिहा हरि: ॥८२॥**

६४२. **कालनेमिनिहा** - कालनेमी राक्षसाला मारणारा ६४३. **वीरः**- शूर ६४४. **शौरिः** - शूरकुलात जन्मलेला श्रीकृष्ण ६४५. **शूरजनेश्वरः**- इंद्रादी शूरांचाही शास्ता ६४६. **त्रिलोकात्मा** - तिन्ही लोकांच्या अंतर्यामी असलेला आत्मा ६४७. **त्रिलोकेशः**-तिन्ही जगांचा स्वामी ६४८. **केशवः** - किरणरूपी केश धारण केलेला ६४९. **केशिहा**- केशी राक्षसाला मारणारा ६५०. **हरिः**- कारणासह संसाराचे हरण करणारा (८२)

**कामदेवः कामपालः कामी कान्तः कृतागमः ।**
**अनिर्देश्यवपुर्विष्णुर्वीरोऽनन्तो धनञ्जयः ॥८३॥**

६५१. **कामदेवः**- चार पुरुषार्थांची इच्छा करणाऱ्या मनुष्यांनी इच्छिलेला देव ६५२. **कामपालः**- सकाम भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारा ६५३. **कामी**- पूर्णकाम ६५४. **कान्तः**- सुंदर शरीर धारण केलेला ६५५. **कृतागमः** - सर्व वेदशास्त्रांची रचना करणारा ६५६. **अनिर्देश्यवपुः**- ज्याच्या दिव्य स्वरूपाचे वर्णन करता येत नाही, असा ६५७. **विष्णुः**- ज्याची कांती पृथ्वी आणि आकाश यांना व्यापून आहे, असा ६५८. **वीरः**- गतिमान ६५९. **अनन्तः**- ज्याला अन्त नाही, असा ६६०. **धनञ्जयः** - अर्जुनरूप (८३)

**ब्रह्मण्यो ब्रह्मकृद्ब्रह्मा ब्रह्म ब्रह्मविवर्धनः ।**
**ब्रह्मविद् ब्राह्मणो ब्रह्मी ब्रह्मज्ञो ब्राह्मणप्रियः ॥८४॥**

६६१. **ब्रह्मण्यः** - तप, वेद, ब्राह्मण आणि ज्ञान यांचे रक्षण करणारा ६६२. **ब्रह्मकृत्** - तप करणारा ६६३. **ब्रह्मा** - ब्रह्मारूप ६६४. **ब्रह्म**- सत्य-ज्ञान-अनंत-स्वरूप ६६५. **ब्रह्मविवर्धनः** - ज्ञान, तप इ. वाढविणारा ६६६. **ब्रह्मविद्** - वेद आणि वेदार्थ पूर्णपणे जाणणारा ६६७. **ब्राह्मणः**- ब्राह्मणरूप ६६८. **ब्रह्मी** - तप, वेद, मन, प्राण यांचे अधिष्ठान ६६९. **ब्रह्मज्ञः** - वेदांना पूर्ण जाणणारा ६७०. **ब्राह्मणप्रियः** - ब्राह्मणांना प्रिय असणारा (८४)

**महाक्रमो महाकर्मा महातेजा महोरगः।**
**महाक्रतुर्महायज्वा महायज्ञो महाहविः ॥८५॥**

६७१. **महाक्रमः** - अत्यंत वेगवान ६७२. **महाकर्मा** - महान कर्मे करणारा ६७३. **महातेजाः** - मोठे तेज असलेला ६७४. **महोरगः** - महान सर्परूप ६७५. **महाक्रतुः** - महान यज्ञस्वरूप ६७६. **महायज्वा** - महान असून यज्ञानुष्ठान करणारा ६७७. **महायज्ञः** - महान असून यज्ञरूप ६७८. **महाहविः** - महान असून हविर्द्रव्यरूप (८५)

**स्तव्यः स्तवप्रियः स्तोत्रं स्तुतिः स्तोता रणप्रियः।**
**पूर्णः पूरयिता पुण्यः पुण्यकीर्तिरनामयः॥८६॥**

६७९. **स्तव्यः** - स्तुती करण्यास योग्य ६८०. **स्तवप्रियः** - स्तुतीने प्रसन्न होणारा ६८१. **स्तोत्रम्** - स्तोत्रस्वरूप ६८२. **स्तुतिः**- स्तवनरूप ६८३. **स्तोता** - स्तुती करणारा ६८४. **रणप्रियः** - लोकरक्षणासाठी युद्ध प्रिय असणारा ६८५. **पूर्णः** - सर्व दृष्टींनी परिपूर्ण ६८६. **पूरयिता** - सर्वांना संपत्तीने परिपूर्ण करणारा ६८७. **पुण्यः** - स्मरणानेसुद्धा पापांचा क्षय करणारा ६८८. **पुण्यकीर्तिः** - ज्याची कीर्ती पुण्यमय आहे असा ६८९. **अनामयः** - सर्व व्याधिरहित (८६)

**मनोजवस्तीर्थकरो वसुरेता वसुप्रदः।**
**वसुप्रदो वासुदेवो वसुर्वसुमना हविः ॥८७॥**

६९०. **मनोजवः** - मनाप्रमाणे वेग असलेला ६९१. **तीर्थकरः** - सर्व विद्या निर्माण करणारा ६९२. **वसुरेताः** - सुवर्ण ज्याचे वीर्य आहे, असा ६९३. **वसुप्रदः** - धन देणारा ६९४. **वसुप्रदः** - भक्तांना मोक्षरूप धन देणारा ६९५. **वासुदेवः** - वसुदेवाचा पुत्र ६९६. **वसुः** - सर्वांच्या अंतःकरणांत निवास करणारा ६९७. **वसुमनाः** - सर्व विषयांमध्ये समभावाने वसणारे मन असणारा ६९८. **हविः** - हविर्द्रव्यरूप (८७)

**सद्गतिः सत्कृतिः सत्ता सद्भूतिः सत्परायणः।**
**शूरसेनो यदुश्रेष्ठः सन्निवासः सुयामुनः ॥८८॥**

६९९. **सद्गति:**- श्रेष्ठ बुद्धी असणारा ७००. **सत्कृति:**- उत्तम कृती करणारा ७०१. **सत्ता**- भेदरहित अनुभवस्वरूप ७०२. **सद्भूति:**- अनेक रूपांत भासमान होणारा सत्स्वरूप ७०३. **सत्परायण:** - तत्त्वदर्शी सत्पुरुषांचे प्राप्य स्थान ७०४. **शूरसेन:**- शूरांची सेना ज्याच्याजवळ आहे, असा ७०५. **यदुश्रेष्ठ:** - यादवकुळातील श्रेष्ठ ७०६. **सन्निवास:**- सत्पुरुषांचे आश्रयस्थान ७०७. **सुयामुन:** - ज्याचा यमुनातीरनिवासी सुंदर परिवार आहे, असा (८८)

**भूतावासो वासुदेवः सर्वासुनिलयोऽनलः।**
**दर्पहा दर्पदो दृप्तो दुर्धरोऽथापराजितः ॥८९॥**

७०८. **भूतावास:** - भूतमात्रांचे मुख्य निवास-स्थान ७०९. **वासुदेव:**-आपल्या मायेने जगाला आच्छादणारा देव ७१०. **सर्वासुनिलय:**- सर्व प्राणांचा जीवरूप आधार ७११. **अनल:** - अपार शक्ती आणि संपत्तीने युक्त ७१२. **दर्पहा** - अधर्म्यांचा अहंकार नष्ट करणारा ७१३. **दर्पद:**- धार्मिकांना गौरव देणारा ७१४. **दृप्त:** - नित्य आनंदात मग्न असलेला ७१५. **दुर्धर:** - हृदयामध्ये धारण करण्यास कठीण ७१६. **अपराजित:** - अंतर्बाह्य शत्रूंकडून पराजित होत नाही असा (८९)

**विश्वमूर्तिर्महामूर्तिर्दीप्तमूर्तिरमूर्तिमान् ।**
**अनेकमूर्तिरव्यक्तः शतमूर्तिः शताननः ॥९०॥**

७१७. **विश्वमूर्ति:**- विश्वरूप ७१८. **महामूर्ति:**- महान रूप असलेला ७१९. **दीप्तमूर्ति:** - तेजस्वी ज्ञानरूप मूर्ती असलेला ७२०. **अमूर्तिमान्** - कर्मजन्य देह नसलेला ७२१. **अनेकमूर्ति:**- भक्तांसाठी अनेक अवतार घेणारा ७२२. **अव्यक्त:**- ज्याचे स्वरूप कळत नाही असा ७२३. **शतमूर्ति:**- शेकडो रूपे असलेला ७२४. **शतानन:**- शेकडो मुखे असलेला (९०)

**एको नैकः सवः कः किं यत् तत्पदमनुत्तमम् ।**
**लोकबन्धुर्लोकनाथो माधवो भक्तवत्सलः ॥९१॥**

७२५. **एकः** - अद्वितीय ७२६. **नैकः** - मायेने अनेक रूपे धारण करणारा ७२७. **सवः**- सोमयज्ञस्वरूपी ७२८. **कः** - सुखस्वरूप ७२९. **किम्**- ब्रह्मस्वरूप ७३०. **यत्** - स्वयंसिद्ध ७३१. **तत्** -विस्तार करणारा ७३२. **पदमनुत्तमम्** - मुमुक्षूंना प्राप्त होणारे अति उत्तम पद ७३३. **लोकबन्धुः** - प्राणिमात्राचा हितैषी ७३४. **लोकनाथः**- लोकांचा नियामक ७३५. **माधवः** - मधुकुळात जन्मलेला ७३६. **भक्तवत्सलः**- भक्तांवर प्रेम करणारा (९१)

**सुवर्णवर्णो हेमाङ्गो वराङ्गश्चन्दनाङ्गदी।**
**वीरहा विषमः शून्यो घृताशीरचलश्चलः ॥९२॥**

७३७. **सुवर्णवर्णः** - सोन्यासारखा वर्ण असलेला ७३८. **हेमाङ्गः**- ज्याचे शरीर सोन्यासारखे आहे, असा ७३९. **वराङ्गः** - सुंदर अंग असलेला ७४०. **चन्दनाङ्गदी** - चंदनाने आणि बाजूबंदांनी सुशोभित ७४१. **वीरहा** - दैत्यवीरांचे निर्दालन करणारा ७४२. **विषमः** - सर्वश्रेष्ठ ७४३. **शून्यः** - कोणत्याही विशेषाने रहित ७४४. **घृताशीः** - आशारहित ७४५. **अचलः**- विचलित न होणारा ७४६. **चलः**- वायुरूप (९२)

**अमानी मानदो मान्यो लोकस्वामी त्रिलोकधृक्।**
**सुमेधा मेधजो धन्यः सत्यमेधा धराधरः ॥९३॥**

७४७. **अमानी** - आत्मभिन्न वस्तूंविषयी अभिमान नसलेला ७४८. **मानदः** - मायेने देहादिकांविषयी आत्माभिमान देणारा ७४९. **मान्यः** - सर्वांना माननीय ७५०. **लोकस्वामी**- चौदाही भुवनांचा स्वामी ७५१. **त्रिलोकधृक्** - तिन्ही लोक धारण करणारा ७५२. **सुमेधाः** - उत्तम बुद्धी असलेला ७५३. **मेधजः** - यज्ञात प्रगट होणारा ७५४. **धन्यः**- कृतार्थ ७५५. **सत्यमेधाः** - सत्य बुद्धी असलेला ७५६. **धराधरः**- पृथ्वीला शेषरूपाने धारण करणारा (९३)

**तेजोवृषो द्युतिधरः सर्वशस्त्रभृतां वरः।**
**प्रग्रहो निग्रहो व्यग्रो नैकशृङ्गो गदाग्रजः ॥९४॥**

